## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७२०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/१०/२०१७

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१०/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी घरी हजर असतांनी यातील आरोपीने फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३५४(अ)(१) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**२) तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१०/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही शाळेत जात असतांनी बस बंद असल्यामुळे घरी येत असतांनी रस्त्यामध्ये यातील नमुद आरोपीतांनी फिर्यादी जवळ येवुन मोटार सायकल थांबवुन फिर्यादीचे भावाचा नाव घेवुन फिर्यादीला अश्लिल शब्दात बोलल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३५४(अ)(४),३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंकी पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/१०/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व त्याची पत्नी व मुली हे आरोपी क्र. १ ते ३ यांना तुम्ही आमचे जागेवर घराचे बांधकाम का करीत आहात व खोदकाम का केले? हा घर आमचे जाण्याचे रस्त्यावर आहे असे हटकले असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी व पत्नीस अश्लिल शिवीगाळ करुन ढकलढुकल करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी प्रवीण जागो कोचे वय ५२ वर्ष, रा. बाजारपेट अडयाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ करुन कुऱ्हाडीचे मुंदाईने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१०/२०१७ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा कामावरुन सायकलने परत येत असता राईस मिल समोर लोकांची गर्दी दिसल्याने त्याने सायकल थांबवुन कश्याची गर्दी आहे? असे बोलला असता यातील आरोपी क्र. १ ने तु होतेस कोण विचारणारा असे बोलुन शिवीगाळ करुन आरोपी क्र. २ ने कुऱ्हाडीचे मुंदाईने डाव्या बाजुला छातीने मारुन आपखुशीने दुखापत करुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी प्रमोद अंताराम भानारकर वय ३२ वर्ष, रा. कुंभली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) लोखंडी विळयाने डोक्याचे मागील भागला मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१०/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा रोडवर मोहल्यातील लोकांना शिवीगाळ करीत असतांनी त्याच वेळी फिर्यादी हा रोडने जात असतांना फिर्यादीने आरोपीस शिवीगाळ का करतोस? असे हटकले असतांना आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन हातात असलेल्या लोखंडी विळयाने डोक्याचे मागील भागाला मारुन जखमी केल्याने फिर्यादी राजकुमार शेदडु ऊईके वय ३५ वर्ष, रा. परसोडी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) पितळी भांडयाची चोरी . :–

दिनांक १९/१०/२०१७ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी हा बौध्द विहाराची साफ सफाई करण्या करीता गेला असता कोणीतरी अज्ञात चोरांनी विहाराचे चायनल गेटचे लॉक तोडुन आत प्रवेश करुन विहारात ठेवलेले एक मोठे पितळी भांडे वजन २० किलो ग्रॅम, २ नग लहान पितळी भांडे प्रत्येकी १५ किलो असा एकुण किंमती २७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी धर्मदास नत्थु रामटेके वय ४६ वर्ष, रा. पुयार यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

७) संगनमत करुन शिवीगाळ व लाथाबुक्याने मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०३/१०/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी क्र. १ यांची घरे एकमेकांच्या घरासमोर असुन त्यांचे आपसात पटत नसल्याने बोलचाल बंद आहे फिर्यादीची नातीण व मुले अंगणात खेळत असतांना फिर्यादीने त्यांना भांडण कश्याला करता असे हटकले असता यातील आरोपी क्र. १ याचा साळा आरोपी क्र. २ नी फिर्यादीस विनाकारण शिवीगाळ करुन ढकलढुकल केले त्याच कारणावरुन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस लाथाबुक्यांने छातीवर मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी खंटटु हरी वाढीभस्मे वय ४५ वर्ष, रा. ईटान यांचे तोंडी व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२५,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

८) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :–

दिनांक १६/१०/२०१७ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल धडक मारुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी तुषार ईस्तारी वैरागडे वय २७ वर्ष, रा. सहकार नगर केसलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

९) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २१/१०/२०१७ चे ०९.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील वाहन सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

१०) नाल्याच्या पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :–

दिनांक १९/१०/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक रविन्द्र मनोहर ठवकर वय ३५ वर्ष, रा. गोवींद नगर पालांदुर हा त्याचे सोबतचे मित्रा सोबत मिळुन आल्यावर पोहण्यास गेले होते. मृतक हा टयुबच्या साहाय्याने पाण्यात पोहत असतांनी त्याचे जवळील टयुब फुटल्याने तो पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी चेतन भिमराव काळे वय ३५ वर्ष रा. पालांदुर त्याचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. शेंडे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १९/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण २५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती २१ केसेस करण्यात आले आहे.

(पो.नि.एस.टी.घुसर )
पो.नी.स्था.गु.शा भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.